'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

# डॉ. भालचंद्र फडके : व्यक्तित्व, परिचय व जडणघडण

प्रा. डॉ. अरुण व्ही. लाडे
मराठी विभाग प्रमुख
राजे धर्मराव कला व वाणिज्य महाविद्यालय,
आलापल्ली, जि. गडचिरोली
email- arunlade59@gmail.com

*जळणारे निखारे सोबत घेऊन ज्यांनी आपली वाट प्रकाशमय केली, त्यांना अंधाराचे कदापी भय नसते. डॉ. भालचंद्र फडके यांच्याबद्दलही म्हणावे लागेल बालपणापासून त्यांनी अनेक दःख पाहिले. हे दु:ख दलित समाजाच्या दु:खाशी जवळीक साधणारे होते. साहित्यात मांडलेले विचार आणि प्रत्यक्षात केलेले आचार यात साहित्यिकांच्या बाबतीत बरीच तफावत पहायला मिळते. दलित जाणिव; सामाजिक दृष्टीने अशा व्यापक, शब्दांचा वापर करणारी साहित्यिक मंडळी समाजात वावरतांना मात्र हेतुपरस्पर हे विसरताना दिसतात. डॉ. फडके यास अपवाद होते.*

डॉ. भालचंद्र फडके यांना अनेक चांगल्या –वाईट गोष्टींना सामोरे जावे लागले. यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडलेले आहे. एखाद्या कार्यात कितीही अडथेळे आले तरी काम सपूर्ण करुन उठायचे असा त्यांच्यातील एक पैलू डॉ. पोखरपूरकर स्पष्ट करतात. ते लिहितात, "अतिगंभीर अशा धोरणातल्या चुका असो किंवा व्यक्तींनी केलेल्या अज्ञानामुळे झालेल्या चुका असोत. सरांना एखाद्याला काम सोपविण्यापूर्वी ती व्यक्ती ते काम करतांना किती चुका करणार आहे यांचा अंदाज अचूक असे. त्यामुळे त्या व्यक्तीला कसे सांगायचे याचे उत्तरही त्यांचेजवळ असायचे ?"[१] यावरुन माणसाला पारखून त्यांच्याशी कसे वागायचे हे गुणवैशिष्ट्य त्यांच्यात होते, असे म्हणावे लागेल. शिक्षण आणि समाज या दोन क्षेत्रांतील त्यांच्या वावरण्यामूळेच त्यांचे हे व्यक्तित्व घडले होते.

**सामाजिक पार्श्वभूमी**

कोणताही मनुष्य आपल्या समाजापासून दूर राहू शकत नाही. समाज आणि व्यक्ती यांच्यातील संबंध दुधातील पाण्यासारखे असते. जसे आपण दुधातील पाणी वेगळे करु शकत नाही. तसे समाजापासून व्यक्तीला दूर करु शकत नाही. प्रत्येक व्यक्तीच्या विचारांवर समाजमूल्यांचा काहीना प्रभाव असतो ; परंतु असे असले तरी पुरोगामी विचाराच्या समतावादी पुरुषाने समाजातील विषमतामूलक बाबींचा आपल्याच समाजाचा निषेध केला हेही वास्तव आहे. ज्यांनी समता, बंधुभाव प्रस्थापित करण्याची भाषा व्यक्त करुन समाजातील सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या जीवनवादी, वास्तववादी साहित्याची खंबीरपणे पाठराखण केली, त्या आदरणीय पुरुषांमध्ये डॉ. भालचंद्र फडके यांचा प्रामुख्याने आपणांस समावेश करावा लागेल.

उदयास येणाऱ्या दलित साहित्याचे महत्त्व आणि त्यांची भावना, पार्श्वभूमी यांचा विचार करुन हेच खरे आणि जिवंत साहित्य आहे, या साहित्याला बळ मिळायलाच हवे, या हेतूनेच डॉ. भालचंद्र फडके यांनी दलित साहित्याची डोळसपणे समीक्षा करुन दलित साहित्याला उजेडात आणण्याचे कार्य केले. हे करीत असताना आपली ब्राह्मणी सामाजिक पार्श्वभूमी त्यांच्या साहित्यकार्यात आड आली नाही. ते निस्वार्थपणे दलित साहित्य समीक्षेच्या, भाष्य, वैचारिक साहित्यनिर्मितीचे कार्य करीत राहिले. त्यांच्या समीक्षेला ब्राह्मणी विचार कधीही स्पर्श

करु शकला नाही. डॉ. भालचंद्र फडके हे कुमारवयात संघाची शाखा चालवित असत; पण तारुण्यात शिक्षणाने, ज्ञानाने, वाचनाने त्यांच्या विचारात, सामाजिक दृष्टिकोनात खूप बदल झाला. लहान वयात त्यांना गुरुदेव रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाढविण्याचा प्रयत्न केला; पण त्यांच्या आयुष्यातले योगायोग काही वेगळेच होते. असे त्यांचे धाकटे बंधू य. दि. फडके यांनी अस्मितादर्शच्या फडके गौरव विशेषांकात म्हटले आहे, ते खरे ठरले. डॉ. भालचंद्र फडके हे महाविद्यालयातीन वयात संतवाङ्मयाचे अभ्यासक होते; पण संतांनी सांगितलेल्या समतेच्या विचारांचा त्यांच्या प्रत्यक्ष आयुष्यावर एक वेगळाच प्रभाव पडला असावा. पुढे शिक्षक असताना औरंगाबादला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात आले, आणि फक्त एक मराठी साहित्यातला समीक्षक व विद्यापीठ स्तरावरचा प्राध्यापक न राहता ते दलित चळवळीचे कट्टर पुरस्कर्ते झाले. सामाजिक, आर्थिक दृष्ट्या अनंत हाल सोसलेल्या अशा मागासवर्गीयांना आपल्या जवळच्या ज्ञानाचा फायदा करुन देऊन त्यांना शिक्षणाने समृद्ध करुन समाजात पुढे आणण्यासाठी ते सतत कृतिशील राहिले.

डॉ. भालचंद्र फडके यांनी अगदी पुरोगामी विचाराने प्रेरित होऊन वास्तवादी दलित साहित्याची पाठराखण केली असली तरी त्यापूर्वी ते मूळचे आस्तिक होते. सर्वसामान्य आस्तिकांसारखे तेही उपासतापास करीत असत. गणपतीची प्रतिष्ठापना आणि पुजा, नवरात्र, श्राद्धासारखे धार्मिक विधी आणि कुळाचार ते करीत, पाळत असत; परंतु विवाह करतांना मात्र त्यांनी कुळाचार आणि इतर गोष्टींकडे त्यांनी दुर्लक्ष केले. त्यांनी आंतरजातीय विवाह केला. पारंपारिक पध्द्तीने त्यांचा विवाह पार पडला; परंतु त्यांच्या विवाहावर बहिष्काराच टाकला. त्यांनी खूप विरोध केला. य.दी. फडके सांगतात, ''जातीच्या हरळीचं मूळ आईच्या मनात इतकं खोलवर रुजलेलं होतं की, हेमा वहिनींशी (डॉ. फडके यांच्या पत्नी) बोलतांना मध्येच तिची वर्णश्रेष्ठत्वाची भावना भडकलेली जाणवत असे."[२] ही भावना त्यांच्या मनातून शेवटपर्यंत पुसली गेली नाही. ही खंत ते व्यक्त करतात. यावरुन त्यांच्या घरात किती कट्टर उच्चवर्णीय ब्राह्मणी विचार परंपरेने चालत आले हे स्पष्ट होते; परंतु त्या ब्राह्मणी विचारांचा प्रभाव डॉ. भालचंद्र फडके यांच्यावर, त्यांच्या साहित्यावर कधीही पडू शकला नाही. डॉ. भाचंद्र फडके यांच्याप्रमाणेच त्यांच्याप्रमाणेच त्यांचा धाकट्या भावांच्या दोन्ही मुलींनी आंतरजातीय विवाह करुन परंपरेला छेद देण्याचा प्रयत्न केला.

RESEARCH JOURNEY

डॉ. भालचंद्र फडके यांची सामाजिक पार्श्वभूमी ब्राह्मण समाजाची असली, तरी ते मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एकनिष्ठ अनुयायी होते. आंबेडकरी चळवळ आणि साहित्य यावरचे डॉ. भालचंद्र फडके यांचे प्रेम आणि निष्ठा शेवटपर्यंत मुळीच कमी झाली नाही. त्यांच्या प्रकाशित साहित्य संपादनेतील २४ पुस्तकांपैकी १२ पुस्तके दलित साहित्यासंबधी आहेत. या सर्व पुस्तकांमधून त्यांनी दलित साहित्याची डोळसपणे समीक्षा करीत असतांना भारतीय समाजातील उच्चवर्णीय परंपरा, कृतीवर कडाडून टीका केली. विषमतेला–जातीयतेला बळ प्राप्त करणारे जे जे साहित्य निर्माण झाले, त्या सर्वच साहित्साचा त्यांनी खरपूस समाचार घेतला. आपल्या साहित्य क्षेत्रात ब्राह्मण समाजातील साहित्यिकांना आता मोकळेपणाने दलित साहित्याचे समर्थन येत असताना या साहित्याच्या सर्वच स्तरांतून विरोध होत होता. त्या काळात डॉ. भालचंद्र फडके हे दलित साहित्याचे समर्थक म्हणून पुढे आले. आणि म्हणूनच त्यांना 'दलित फडके' म्हणून हिणवत असत. यातच त्यांचे मोठेपण सिद्ध होते.

डॉ. भालचंद्र फडके हे वागण्या–बोलण्यात अतिशय सौम्य आणि मृदु होते. या संदर्भात प्रा. दत्ता भगत आपले अनुभव सांगतात, "त्यांच्याबरोबर चर्चा करणाऱ्यांना जर त्यांच्या सहवासात येणाऱ्यांना हा ठाम

वैचारिक कणा असणारा आहे की नाही ह्याचा संशय यावा इतके ते मृदु आणि सौजन्यशील आहेत. त्यांच्या लेखनातही एक प्रकारच्या संयमी, मृदु विचारकाची झाक आहे. पण भूमिकांच्या बाबतीत मात्र ते अतिशय कडवे आणि रोखठोक आहेत, असाच प्रत्यय त्यांचे लेखन वाचू लागले म्हणजे येतो."[३] असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. या मृदु व्यक्तिमत्त्वाला मात्र चांगली उंची, गोरेपान शरीर लाभल्याने ते अधिकच प्रभावी दिसत. हे त्यांचे व्यक्तिमत्त्वाला मात्र पक्षाघाताने लुळे करुन सोडले; पण ते जिद्दीने डाव्या हातानेही लिहीत राहीले. या सर्वांच्या मागे डॉ. बाबासाहेबांचीच प्रेरणा आहे असे ते मान्य करतात. ते म्हणतात की, "आजवर आपणावर आणि माझ्या कुटुंबीयांवर आडून अनेक आघात झाले आहेत. ते सर्व आपण सोशीत आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'लढा–लढा' असाच आदेश देत आहेत."[४] ही लढण्याची ताकद डॉ. बाबासाहेबांच्या विचार, कार्य, आणि दलित साहित्य चळवळीतून त्यांना लाभली.

त्यांच्या वाट्याला कितीतरी संकटे आलीत; परंतु न डगमगता हसतमुखाने त्याचाही सामना करीत ते पुढे जात राहिले. विद्यार्जन करतांना त्याचे बालपणही करपून गेले. तरी पण त्यांच्या चहेऱ्यावरील हास्य मात्र कधी लोपले नाही. सौ. हेमलता भालचंद फडके म्हणतात की, "वास्तव हे प्रखर आणि होरपळून काढणारं असतं. फार थोड्यांच्या वाट्याला वास्तवाशी झगडण्याचंच जीवन येतं. त्यातलेच सरही; पण परिस्थितीशी मुकाबला करताना सरांनी जिद्द सोडली नाही. कधी कधी त्यांचे डोळे पाण्यानं भरुन यायचे पण दुःखः, अहं. तोंडातून चकार शब्द बाहेर पडायचा नाही. ही सहन करण्याची शक्ती सरांना त्यांच्या आजीनं, वडिलांच्या आईनं, अनुअक्काने दिली."[५] परिस्थितीतूनच त्यांना लढण्याचे बळ मिळत गेले. कितीही वाईट प्रसंग ओढवले, तरी जीवनात त्यांनी कधी पैशासाठी आपली तत्त्वे बदलली नाहीत. जीवनाचा जो मार्ग त्यांनी स्वीकारला त्यांच्याशी ते एकनिष्ठ राहिले.

आंबेडकरी चळवळींचा त्यांच्यावर प्रभाव असल्याने त्यांनी वेळोवेळी त्या संदर्भात प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष कार्यही केले आहे. मदत करण्याची जाणीव, भावना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग, गुणविशेष होता. यासंबंधी वामन होवाळ यांचा अनुभव सांगण्यासारखा आहे. डॉ. भालचंद्र फडके यांचा वामन होवाळशी परिचय नसल्याने डॉ. फडके यांचे संस्कार आपल्या कथालेखनावर झाले नाहीत, असे वामन होवाळ मानत असले तरी, "माझे नाव, सर्वतोमुखी व्हायला डॉ. भालचंद्र फडकेसुद्धा कारणीभूत आहेत."[६] हे ते मान्य करतात. डॉ. भालचंद्र फडके हे त्या वेळी उच्च माध्यमिक अभ्यासक्रम मंडळाचे सदस्य होते. त्यांनी वामन होवाळ यांची 'मजल्याचं घर ' ही कथा बारावीच्या अभ्यासक्रमात सामाविष्ठ करण्यासाठी प्रस्ताव मांडला असता इतर सदस्यांनी प्रस्तावाला प्रखर विरोध केला. अखेर डॉ. भालचंद्र फडके यांनी लेखकांच्यावतीने हमी घेऊन कथेतील 'महारडया' सारखे जातिवाचक शब्द काढून 'मजल्याच घर' ही कथा बारावीच्या अभ्यासक्रमात लाखो विद्यार्थी व हजारो प्राध्यापकांर्यंतच पोहोचले. खरे तर त्या काळातही त्यांचा आणि वामन होवाळ यांचा व्यक्तिशः परिचय झालेला नव्हता . तरीही त्यांनी वामन होवाळ यांचर हमी घेऊन ती कथा निवडली . पुढे त्या कथेचे हिंदी, कानडी, इंग्रजी भाषेत भाषांतर झाले. श्याम बेनेगसारख्या दिग्दर्शकाने ती छोटया पडद्यावर आणली. तीत सदाशिव अमरापूरकर यांनी सयाजीची भूमिका साकारली. हे सारे घडले ते डॉ. भालचंद्र फडके यांच्या प्रयत्नाने . ही आबेडकरी जाणीव त्यांच्या व्यक्तिमत्वात भिनली असल्यामळेच त्यानी अनेकांना साहित्य आणि व्यक्तिमत्व मदत केली.

**जन्म, बालपण व शिक्षण**

कर्नाटक राज्यातील डॉ. भालचंद्र फडके यांचा जन्म १३ मे १९२५ मध्ये धरवाड येथे झाला. त्यांचे बालपण खूप हालअपेष्टा सहन करत पार पडले. त्यांचे वडील हे कीर्तनकार होते. कीर्तनाच्या निमित्याने ते नेहमी बाहेरच असायचे. हैदराबादच्या मुक्ती संग्रामात त्यंनी भाग घेतला होता. बेचाळीसच्या चळवळीतही ते होते. अमूक एका पक्षात काम करायचं अशी वृत्ती नव्हती; पण भावंडे तेव्हा लहान होती. वडील सारखे बाहेर त्यामुळे घराचा सर्व भार डॉ. भालचंद्र फडके यांच्या आईवर आणि आजीवर पडला. त्यांची आजी खूप धिराची आणि कणखर व्यक्तिमत्वाची होती. वाटेल तितकी कष्ट करायची तिची तयारी असे. कुणापुढे लाचार व्हायचं नाही, परिस्थितीशी झगडायचं अशी तिची जिद्द होती. कष्टांचं हेच वळण तिनं डॉ. फडके आणि त्यांच्या भावंडांना बालपणीच लावलं. गुरुदेव रानडे हे त्यांच्या वडिलांचे गुरुबंधु डॉ. फडके यांच्याकडे त्यांचे येणे—जाणे असे डॉ. फडके यांच्या शिक्षणाचा भार उचलायची त्यांची तयारी होती; पण आजीने तिकडून कधीही मदत घेतली नाही. लहानपणापासूनच हा करारी बाणा डॉ. फडके यांच्यात रुजला होता. पुढे हाच साहित्यातही दिसतो.

**बालपण**

डॉ. भालचंद्र फडके यांनी पुढे अनेकांना, गरजू होतकरु विद्यार्थ्यांना मदत केली; परंतु त्यांचे बालपण— खूप कष्टात गेले. अत्यंत हलाखीत दिवस काढले, दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर अपार कष्ट करुन शिक्षण करुन शिक्षण घेतले. आपल्या हालअपेष्टांची वाच्यता कधी केली नाही. वडील कीर्तनासाठी गावोगावी फिरत असल्यामुळे मुलांच्या संगोपनासाठी त्यांच्या आईल छोटीमोठी कामे करावी लागत. त्यांच्या आईचे काक विजापूरला शाळेत हेडमास्तर होते. डॉ. फडके यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड, घरात तीन भावंडे , एक बहीण . अशा स्थितीत आपलं शिक्षण कसं होणार म्हणून वयाच्या चौदाव्या वर्षी सर घराबाहेर पडले. अस्मितादर्शच्या विशेष गौरव अंकात सुभाष नाईक यांनी पुढील किस्सा सांगितला आहे. ते खूप नाटकिय आहे. ते घराबाहेर पडल्यानंतर रेल्वे स्टेशनवर येऊन विनातिकीट एका गाडीत बसले. कुठे जायचे वगैरे काहीच धड ठरविलं नव्हतं. फक्त शिकण्याची दुर्दम्य इच्छा. गाडीत एक आसामी गृहस्थ भेटले. त्यांनी विचारापूस केली. मुलगा होतकरु आहे. असं पाहून त्या गृहस्थांनी डॉ. फडके यांना आपल्याबरोर आसामला नेले. तिकडे तीन वर्षे राहून ते इंग्रजी व टंकलेखन शिकले. वयाच्या सतराव्या वर्षी ते पुन्हा आपल्या कुटुंबाला येऊन मिळाले. त्यांचे बालपणही अशा प्रकारच्या विविधांगी व्यापले असल्यामुळे पुढे आयुष्यात आलेल्या संकट , हालअपेष्टांना हसतहसत त्यांना तोंड देता आले.

**शिक्षण**

माणसानं पडतील ते कष्ट करावेत, स्वत:इ कमवावं आणि त्यातून पुढं यावं अशी शिकवणूक त्यांच्या आजीकडून त्यांना मिळाली. या सर्व गोष्टींचा त्यांच्यावर खूप चांगला परिणाम झाला. शाळेत आल्यापासून ते अनेक कामे करु लागले. थोंड फार मिळवू लागले. सोलापूरच्या रोटरी क्लबचा शिपाई म्हणूनही त्यांनी काम केलं आहे. 'सोलापूर समाचार' च्या प्रेसमध्ये ते काम करीत असतं.

पुढे कॉलेजमध्ये असतांना त्यांनी शिवण्याही केल्या. १९४२ ते ४५ या युध्दकाळात कंट्रोलर ऑफ टेक्सटाईल्सच्या ऑफिसमध्येही त्यांनी काम केले. त्या काळात पन्नास रुपये म्हणजे चांगला पगार मिळायचा; पण ही नोकरी करातांना त्यांची कराचीला बदली झाली. परंतु 'कराचीला गेलो तर भावडांचं शिक्षण नीट होणार नाही', या जाणीवेने त्यांनी ती नोकरी सोडली.

शिक्षणासोबत त्यांना इतर गोष्टीतही रस होता. त्यांना कला, क्रिडा, साहित्य सर्वांचे अंग होते. ते तरुणपणी मैदानी खेळ , दांडपट्टा, लाठीकाठी इ. चालवण्यात तरबेज होते. ते हार्मोनियम व बासरी वाजवत असत. त्यांना फोटोग्राफीचीही माहिती होती. शाळेत असताना ते क्रिकेटर होते. ते एक उत्तम बॅडमिंटनपटूसुध्दा होते. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या वेळच्या शिक्षकांच्या सामन्यामधील त्यांची मॅच त्या वेळचे एक शिक्षक श्री. के.पी. कुलपर्णी व मुख्याध्यापक श्री. के.ना. पिले यांच्यात तुफान रंगात असे. त्यांचा खेळ आक्रमक असायचा. त्या वेळी शाळेच्या सभागृहात विद्यार्थ्यांची अलोट गर्दी होत असे. त्यांना नाटकाचे मोठे आकर्षण होते. महाविद्यालयीन वयात त्यांनी नाटकात भूमिकाही केल्या होत्या व पुढे शाळेत शिक्षक असतांना दरवर्षीच्या संमेलनात त्यांनी दिग्दर्शित केलेले विद्यार्थ्यांचे नाटक मोठे आकर्षण असायचे. हे नाटक कायम गाजायचे.

डॉ. फडके यांचा शैक्षणिक काळ वैविध्याने नटलेला आहे. एक विद्यार्थी असतांना चतुरस्र अनुभव ग्रहण करुन नवनवीन ज्ञान आत्मसात करुन त्यांनी आपले विद्यार्थी जीवन घडविले आहे. पुढे हाच अनुभव विद्यार्थी घडविण्यात प्रत्यक्षरुपात आला. नवे काही करण्याची उमेद त्यांनी शेवटपर्यंत जोपासली. पंचावन्नाव्या वर्षी जेव्हा त्यांनी एफ.टी.आय. मधील दिग्दर्शनाचा कोर्स केला तेव त्यात ते पहिल्या क्रमांकावर होते. त्यांनी शिक्षण घेणे आणि देणे शेवटपर्यंत सोडले नाही.

डॉ. फडके हे व्यासंगी व्यक्ती होते. नव्याच्या शोधात असणाऱ्या डॉ. फडके यांनी आपले मन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे विद्यार्थीमय असेच ठेवले. शिकत जाणे हा त्यांच्या स्थायीभाव होता. टी.व्ही माध्यमाची माहीती करुन घेण्याची त्यांची इच्छा झाली आणि त्यांनी पुर्णही केली. डॉ. फडके यांचे विद्यार्थी डॉ. राजा पोखरापूरकर यांच्याकडे फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी होती. याबद्दल डॉ. पोखरापूरकर म्हणतात की, "टि.व्ही. माध्यमाची पूर्ण माहिती करुन घ्यायची म्हणून फिल्म इन्स्टिट्युट मधील टी.व्ही.ट्रेनिंगचा कोर्स सरांनी पूर्ण केला. या शिक्षणास फक्त सरकारी टी.व्ही. सेटवरील कर्मचाऱ्यांना प्रवेश दिला जात असे; पण त्यातसुध्दा खास परवानगी घेऊन सरांनी हे प्रशिक्षण केले."[७] अध्ययन, अध्यापन,आणि संशोधन हे त्यांच्या व्यक्तिमत्वातील महत्वाचे विशेश होते. सरांना काही गोष्टी सांगताना अवघडल्यासारखे होई; पण मोकळे करण्याची डॉ. फडके यांची हातोडी फार विलक्षण होती, असेही डॉ. पोखरापूरकर आपले अनुभव कथन करतांत.

RESEARCH JOURNEY

**कौटुंबिक, वैचारिक वारसा**

डॉ. भालचंद्र फडके यांना कधी काहीही सहज मिळाले नाही. बालपणापासूनच तर जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत विविध हालअपेष्टांनी साथ काही सोडली नाही; परंतु अशा बिकट परिस्थितीत त्यांच्या विचारांचा समतोलपणा कधीही डळमळला नाही. आणि हा लढाऊ बाणा कुटुंबातील आई, आजी यांच्यासारख्यांकडून त्यांना प्राप्त झाला. सोबतच आईच्या रागालाही त्यांना समोर जावे लागले.

डॉ. भालचंद्र फडके यांनी आंतरजातीय विवाह केल्यामुळे आईचा रोष त्यांनी ओढवून घेतला. पत्नीच्या कुटुंबातील कर्ते पुरुष आकली निधन पावल्यामुळे त्या कुटुंबातल्या समस्यांनाही त्यांना तोंड द्यावे लागले. आई जुन्या कर्मठ संस्कारात वाढली असल्यामूळे त्यांनी केलेल्या आंतरजातीय विवाह तिला मानसिक धक्का बसला. शेवटपर्यंत हा आघात त्या पचवू शकल्या नाहीत. आपल्या मोठया मुलावर तिचा जीव असला तरी डॉ. फडके मात्र आईचा सहवास, पोरकेच राहिले. या कौटुंबिक तुटकपणाचा त्यांच्यावर परिणाम झालाही; परंतु अशाही परिस्थितीत त्यांनी जे कतृत्व सिध्द केले, ते खूप मोठे आहे.

डॉ. भालचंद्र फडके यांना तीन भाऊ य. दी. फडके व अनिल. फडके. डॉ. फडके हे सर्वात मोठे त्यामुळे वडिलांच्या गरीब, हलाखीच्या संसारामध्ये कुटुंबाच्या जबाबदारीचा भार तरुण वयात त्यांच्यावर प्रथम पडला. पुढे त्यांच्या भावांनी आपापल्या परीने स्वत:ला घडविले; पण सुरुवातीच्या काळात कुटुंबातला सर्वात मोठा मुलगा म्हणून त्यांना जबाबदारी उचलावी लागली. त्यांनी ती चांगल्या प्रकारे पार पाडली. प्रसंगी त्यांच्या शिक्षणाचीही आबाळ झाली.

३० मे १९६२ साली डॉ. भालचंद्र फडके यांचा हेमाताईंशी विवाह झाला. त्या वेळेस ते अकोल्याच्या कॉलेजमध्ये नुकतेच रुजू झाले होते. आंतरजातीय विवाह केल्याने आणि नोकरीनिमित्त घरापासून दूर नुकताच विवाह झालेल्या या जोडप्यास राहायला सुरुवातीला योग्य असे घरही नव्हते. (विवाह झाल्यानंतरच्या आठवणी) सौ. हेमाताई सांगतात. यावरुन डॉ. फडके यांच्या तत्कालीन परिस्थितीचा आपणास जाणीव होईल. अकोल्याला 'पोंडा हाऊस' नावाचा बंगला होता. प्रशंस्त बंगला आणि त्याच्यासमोर अशी बाग, सारं रमणीय वातावरण. या बंगल्याच्या पाठीमागे लागूनच असलेल्या पडवीत सहा खोल्या काढल्या होत्या. त्यातला दोन खोल्या डॉ. फडके यांनी घेतल्या. नववधूला तिचे माहेरचे मोठे घर सोडून आपल्यामुळे अशा या घरात यावे लागत आहे, याबद्दल त्यांना दु:खही झाले; पण हेमाताईंनी त्यांना तिथे खूप मोठी साथ दिली. त्या काळी म्हणजे १९६२ ला ते शेतकी कॉलेजला मराठीचे प्राध्यापक होते. त्यांची पब्लिक सर्व्हिस कमिशनकडून निवड झालेली होती.

एक साधे, सरळ स्वभावाचे म्हणून डॉ. भालचंद्र फडके हे परिचित आहेत. आणि ते खरेही आहे. समीक्षणतून त्यांच्या स्पष्ट, परखड विधानांवरुन ते 'खडूस' वाटले तरी प्रत्यक्षात मात्र उलट होते. मोठेपणाचा बडेजावपणा नाही की, वागण्यातला औपचारिकपणा नाही. अगदी सहज असे त्यांचे वागणे असे. हिरा बन्सोडे आपला अनुभव सांगतात, ''कुठलाही साहित्य संमलनात संमेलनाच्या अध्यक्षांचा किती बडेजाव, मानसन्मान असतो. त्यांच्यासाठी खाण्याजेवण्याची स्पेशल व्यवस्था असत; पण हे सारे सोपस्कर सोडून आम्हा सर्वांबरोबरच पिडलं– भाकरी खाणारा साहित्य संमेलनाचा अध्यक्ष फक्त डॉ.भालचंद्र फडके हेच असू शकतात. म्हणूनच ते आपले वाटतात. त्यांच्या ज्ञानाचा, विद्वत्तेचा तोरा त्यांनी कधी मिरवला नाही. उलट त्यांचा हात नेहमी शाबासकीची थाप पाठीवर मारण्यासाठी तत्पर असतो.''[८] त्यांची ही वैचारिक मशागत लहानपणापासूनच त्यांच्या आजीकडून होत गेली. डॉ. भालचंद्र फडके हे जव्हा मिलिंद महाविद्यालयात दाखल झाले. तेव्हा डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना जवळून निरखता आले. समता, स्वातंत्र्य, बंधुता या त्रयींचा प्रभाव (त्यांच्यावर) त्याच काळात त्यांच्यावर झाला. या विचारांची मशाल घेऊनच साहित्यातील अनेक कुप्रथा, प्रवृत्तींची त्यांनी होळी केली आणि दलित साहित्यात नवप्रकाशाची वाट तयार केली.

## डॉ. भालचंद्र फडके यांची वाङ्मयीन जडणघडण

एक समीक्षक, भाष्यकार म्हणून मराठी साहित्यात नावारुपास येण्यापूर्वी, डॉ. भालचंद्र फडके यांचे काही प्रमाणात लेखन सुरु होते. दलित जाणिवेनी ते युक्त नसले तरी पुढील दलित समीक्षक म्हणून उदयास येण्यासाठी ते कारणीभूत ठरले. ते कॉलेजमध्ये शिक्षण घेताना शारदोपासक मंडळाचे काम जोरात चालत असे. द.रा. बेन्द्रे, कवी कुंजबबिहारी, त्र्यं. वि. सरदेशमुख, श्रीराम पुजारी, निर्मलकुमार फडकुले, रंगा वैद्य, रा.ना. पवार, य. फडके, असे अनेकजण शारदोपासक मंडळाच्या कामात उत्साहाने भाग घेत असत. वार्षिक संमेलनही ते भरवीत असत. 'सोलापूर समाचार' मध्ये त्यांनी भरपूर लिहिले आहे. त्या लेखनाची त्या वेळी थट्टा झाली

असली तरी मात्र एक लेखक, स. शिक्षक म्हणून घडायला शारदोपासक मंडळाची फार मदत झाली, असे खुद्द डॉ. भालचंद्र फडके यांनीही ते मान्य केले आहे.

मिलिंद महाविद्यालय हे फक्त शैक्षणिक स्थळ नसून डॉ. भलचंद्र फडके यांच्यासाठी ते जीवनातील एक महत्त्वाचे, आदराचे, पूज्यनीय घअक होते. याच महाविद्यालयात आल्यानंतर त्यांना विविध संवेदनशिल अनुभवांना सामोरे जावे लागले. दलित तरुणांच्या या अनुभवांतून, लिखाणातून डॉ. भालचंद्र फडके यांच्यातील लेखक, समीक्षक, भाष्यकार आकार घेत होता, त्याला पूर्णत्व येण्यासाठी मिलिंद महाविद्यालयात हे महत्त्वाचे ठिकाण ठरले.

दलित समाजाचे दु:ख डॉ. फडके यांना आपले आणि जवळचे वाटतात; कारण त्यांनाही अनेक दु:खांना तोंड द्यावे लागले, खस्ता खाव्या लागल्या. उपेक्षेचे घाव सोसावे लागले. ते म्हणतात, ''भरभरुन सुख सहज मिळतं ते खरंच भाग्यवान. आपल्याला तर रात्रंदिवस झगडावंच लागलं. माझ्यासारख्या कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म घेतलेल्या माणसाला सस्तिवासाठी, जगण्यासाठी संघर्ष करण्यावाचून दुसरा पर्याय नव्हता. म्हणून तर दलित जाती – जमातीतील जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर माझी 'वेव्हलेंग्थ जुळून गेली."[९] माणसाला जगण्यासाठी बळ देत असे म्हणतात. हे डॉ. फडके यांच्या अनुभवातून स्पष्ट होते. त्यांचे आयुष्य अनेक उतार–चढावाने व्यापलेले आहे. या उतार– चढावातून त्यांच्या आयुष्याला एक निश्चित बैठक प्राप्त झाली. दलित समाजाच्या वेदना–जाणिवांणी त्यांची वैचारिक दृष्टीने भरणपोषण केले आहे.

डॉ. बाबसाहेब आंबेडकर दीक्षा समारंभात म्हणाले होते, 'बुध्द धम्म विश्वधर्म आहे. माझे क्षेत्र अस्पृश्यांपुरतेच मर्यादित करायचे नाही, संपूर्ण भारतात धर्मचक्रप्रवर्तन घडवून आणावयाचे आहे.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकांच्या विचारात विचारक्रांती करावी लागते, मग आचारक्रांती करावी लागते असेही म्हणाले होते. त्यांनी समाजपरिवर्तनासाठी जीवनभर कार्य केले. त्यांच्या विचारांचा डॉ. फडके यांच्यावर मोठा प्रभाव आहे. ते म्हणतात. "दीक्षाविधी संपल्यावर बाबसाहेबांनी जे भाषण केले ते कधीच विसरणार नाही. या भाषणातील विचारसुत्राचा मागोवा घेत मी बाबासाहेबांचे चरित्र, त्यांनी केलेली आंदोलने, त्यांची विचारसंपदा यांचा सतत अभ्यास केला. त्यांच्या कार्याचा परिचय करुन देण्यासाठी गावोगाव गेलो, वस्त्यावस्त्यांतून हिंडलो, त्यामुळे मला दलित जाती–जमातीचे मन जाणता आहे."[१०] त्यांचा विचारांची बैठक ही डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचे आचार–विचार आणि दलित वेदना–जाणिवांनी तयार झाली आहे. दलित साहित्यातील त्यांच्या भूमिकेचा अभ्यास केला तर सहज लक्षात येईल.

**'युगयात्रा' व दलित साहित्य चळवळीत प्रवेश**

हजारो वर्षांची गुलामगिरी, विषमतेने पिचून निघालेला समाज, वाट्याला आलेले जनावरांपेक्षा हीण जगणे, भारतीय समाजव्यवस्थेने अनेक वेळा घेतलेले असंख्य शंबुकाचे बळी, मानवतेसाठी लढा देणारा दलित समाजाने युगानुयुगे भोगलेला अन्याय, अत्याचार, दु:खाच्या वेदना साकार करणारे 'युगयात्रा' हे महान नाटकाचे लेखक मिलिंद महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य आदरणीय म. भी. चिटणीस होते.

६ डिसेंबर १९५६ रोजी. बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. मिलिंद महाविद्यालय, सारे वसतिगृह शोकसागरात बुडाले होते. डॉ. फडके तेव्हा वसतिगृहाचे प्रमुख होते. जो तो डॉ. बाबासाहेबांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी मुंबईकडे निघाला. डॉ. बाबासाहेब दर्शन घेऊन परतलेली मुले आपापल्या खोल्यात हंबरडा फोडत होती. ही विदारक परिस्थिती डॉ. भालचंद्र फडके उघडया डोळयाने पाहात होते. स्वप्ने उराशी बाळगून जगणाऱ्या

तरुण पिढीने सोसरलेले आघात त्यांना जाणवत होते. त्यांचे सांत्वन करणे त्यांच्याही शक्तीपलीकडचे होते. त्या विद्यार्थ्यांची अगतिकता, त्यांचा पोरकेपणा त्यांच्या शब्दांतून त्यांना जाणावे. डॉ. बाबासाहेबांच्या चिरवियोगाचे दु:खच एवढे विराट होते की, ते मुलं सोशू शकत नव्हती. डॉ. बाबासाहेबच्या आठवणी काढीत ते आतल्या आत रडत होती, डॉ. बाबासाहेबांच्या नंतर आमचं कसं होईल? ही भावना त्यांच्या मनात निर्माण झाली. अनेक प्रश्न त्यांच्यापुढे उभे ठाकले. दलित विद्यार्थ्यांचे हे अतीव दु:ख जवळून पाहिले. डॉ. भालचंद फडके यांनी त्यांना 'जे भोगले, ते लिहून काढा' असे मार्गदर्शन केले, त्यांचे सांत्वन केले. मुले मोडके तोडके लिहू लागली. त्यांच्या जळणाऱ्या अंत:करणातून वेदनेच्या ज्वाला बाहे पडू लागल्या. अशा प्रकारे मिलिंद महाविद्यालयाचे वार्षिक अंकही तयार झाले. या स्मृती अंकात डॉ. भालचंद्र फडके यांनी त्यांच्या कर्तत्वाचे मुल्यवान करणारा पहिला लेख लिहिला. तेव्हापासूनच दलित चळवळीत सक्रिय होऊन दलित साहित्याला अधिष्ठान प्राप्त करुन देण्यासाठी खुल्या मनाने पुढे आले.

**दलित फडके –**

आपल्या भारतीय समाजव्यस्थेने रुढ केलेल्या चार वर्णातील खालच्या शुद्र वर्णाला कायमचीच हिण वागणूक देऊन माणुसकीचे हक्क नाकारणाऱ्यास तथाकथित उच्च समाजाने आपले समाजाला वरचढ होऊ दिले नाही. दलितांनी लिहिलेल्या साहित्यासंबंधी तसेच झाले. आपल्या भावना शब्दध्द करुन साहित्याच्या कोंदणात बसवू वाहणाऱ्या त्यांच्या प्रयत्नांची प्रस्थापित साहित्यिकांनी टिंगल केली. दलितांच्या विकसाची हरप्रकारे 'गोची' करणाऱ्या या समाजाने 'दलित साहित्याची' आणि त्यास समर्थन करणाऱ्या पुरस्कर्त्यांचाही विरोध सुरु केला. डॉ. भालचंद्र फडके यांना तो प्रखरपणे सहन करावा लागला.

डॉ. भालचंद फडके हे १९६९ मध्ये पुणे विद्यापीठात आले. येथे त्यांना बऱ्याच कटु अनुभवांना सामोरे जावे लागले. पहिले सात–आठ दिवस शीतयुध्दात गेल्यानंतर मग काम सुरळीत सुरु झाले. मराठी विभागप्रमुख डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी चांगले काम केले. दलितांचे लेखन, त्यांच्या समास्या यांविषयी ते बोलतच होते. येथेही वसतिगृहाचे प्रमुख म्हणून काम करीत असल्याने मागावर्गीयांच्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नात लक्ष घालत विद्यापीठाच्या विविध समित्यांत मागासवर्गिय विद्यार्थ्यांचे प्रश्न ध्यास धसास लावल्यामुळे काही जण रुष्ट होतेच. त्यांना वेळोवेळी मदत करणाऱ्या डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या निवृत्तीनंतर सारी हवा बदलली. जवळजवळ तीन वर्षे छळ , अवहेलना, उपेक्षा तेवढी त्यांच्या वाटयाला आली. दलित साहित्याची बाजू मांडली म्हणून मित्र म्हणणारे 'दलित फडके' अशी त्यांची हेटाळणी करीत असत; पण या छळाला, हेटाळणीला त्यांनी कधी भीक घातली नाही. ते डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा अभ्यास करीत होते. दलित साहित्यांची चर्चा चालू होती. बार्शी , चंद्रपूर , अकोला, मुंबई इ. साहित्य संमेलनाच्या मंचावरुन, वेगवेगळया चर्चासंत्रातून दलित साहित्याची बाजू त्यांनी मांडली. या साहित्याच्या प्रेरणा कोणत्या , त्यापाठीमागे तत्वाज्ञान कोणते? यावर ते विचार मांडीत गेले. या वैचारिक चर्चेतून, संवादातून दलित साहित्य व दलित चळवळ विकास पावू लागली. आणि आज तिचे महावृक्षात झालेले रुपांतर डॉ. भालचंद्र फडके यांच्या सोबतच विविध दलित साहित्यिकांच्या प्रयत्नांचे फळ आहे.

**डॉ. भालचंद्र फडके यांचे मराठीचे उत्कृष्ट अध्यापन –**

एक आदर्श शिक्षक कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. भालचंद्र फडके ! त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत स्वत:ला सिध्द करुन विद्यापन करुन अनेक विद्यार्थ्यांना घडविले आहे. ते फक्त शिकवीत नसत तर

विद्यार्थ्यांच्या समस्यांना सोडविण्यासाठी ते स्व: पुढाकार घेऊन त्यांना मदत करीत असत. अनेकांच्या आयुष्यात आनंद फुलण्यामागे डॉ. फडके सरांचा सिंहाचा वाटा आहे. दलित विद्यार्थ्यांच्या मनात डॉ. फडके यांच्याबद्दल आदराचे स्थान आहे. सौ. हेमलता भालचंद्र फडके म्हणतात, ''सर सर्वस्वी विद्यार्थ्यांचे आहेत, सर दलित चळवळीचे आहेत हया गोष्टींचा मला विलक्षण आनंद होतो. सरांचा हा सामान्य माणसाचा संसार नाही. सरांचा संसार हे विद्यार्थ्यांचे घर आहे. घर हे नेहमीच आपलेपणाचा दिलासा देते''[११] हे अगदी खरे आहे.

विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याविषयी किती आदराची भावना आहे, हे पुढील विधानावरुन कळू शकेल, डॉ. कल्याणी दिवेकर आपला अनुभव सांगतात की, ''खरं म्हणजे शिक्षण घेताना असे अनेक गुरु आपल्याला भेटत असतात. पण त्या प्रत्येकाचं नाव आपल्या काळजावर कोरलं जातंच असं नाही. डॉ. भालचंद्र फडके ऊर्फ 'फडके सर' हे एक असे नाव आहे की, ज्याचा उच्चार एखाद्या सांप्रदायिक वर्तुळातील माणूस करेल, त्याचप्रमाणे भक्तिभावानं केला जातो. गंमत अशी की, मंदीराचे दरवाजे कधी कधी 'कुणाच्या तरी' सोयीसाठी बंद ठेवले जातात. पण फडके सरांचे घर कोणत्याही विद्यार्थ्यांसाठी सतत खुलं असतं.''[१२] डॉ. भालचंद्र फडके यांनी कधीही आपली सोय बघितली नाही. अगोदर ते विद्यार्थ्यांचा विचार करीत. वाटेल ती मदत करण्यासाठी ते तत्पर राहण्याचा संवेदनशील असा स्वभाव होता.

महाविद्यालयाचे प्राध्यापक होणपूर्वी त्यांनी शाळेचे शिक्षक म्हणून काम केले. 'विद्याविकास ' मध्ये आणि नंतर 'हरिभाई देवकरण' मध्ये दहा वर्षे ते शिक्षक पदावर होते. डी. एड. कॉलेजमध्ये शिक्षण सुरु असतानाच ते शाळेत नोकरी करीत होते. बरीच पायपीट त्यांना करावी लागली तरी विद्यार्थ्यांशी जवळीक साधाची आवड शाळेत शिक्षक असल्यामुळेच लागली असे म्हणत. शाळेत शिकविल्याने अनेकांच्या बाबतीत शाळकरीपणा येत असला तरी डॉ.भालंचद्र फडके यांच्याबाबतीत असे घडले नाही. शाळेत असल्यापासून त्यांनी बऱ्यापैकी वक्तृत्व जोपासले होते. शिकवायचा विषय मनात चांगला असल्यामुळे पुस्तक किंवा टिपण पुढे न ठेवताच शिकवायची सवय त्यांनी पहिल्यापासूनच लावून घेतली होती. त्यांचे शिकविणे खूप सहज, सोपे असे. त्यामुळे ते विद्यार्थ्यांना सहज समजत , असे वामन निंबाळकर आपला अनुभव सांगतात. ''वाङमयासारखा कठीण विषय ते अत्यंत सोप्या भाषेत, विद्यार्थ्यांना समजले अशा भाषेत शिकवू लागले. त्यांच्या वर्गाला विद्यार्थ्यांची गर्दी असे. ज्या विद्यार्थ्यांना पिरेड नसायचे, इतकेच काय ज्यांचा मराठी विषयही नसे ते विद्यार्थीही फडके सरांच्या वर्गात गर्दी करुन बसत. मला आजही त्यांच्या शिकविण्याचे एक उदाहरण आठवते. ते प्राचीन काव्य आणि अर्वाचीन काव्य यातील फरक समजावून सांगत होते. हा फरक कसा–कसा होत गेला, हे त्यांनी सांगितले. शेवटी ते म्हणाले, 'मी उदाहरण देऊनच तुम्हाला हया दोन काव्यातील फरक सांगतो. प्राचीन काळातील आई ओवी म्हणयची.–

**'पहिली माझी ओवी, पहिला माझा नेम,**
**तुळशीखाली राम, पोथी वाची।।**
**आणि आधुनिक युगातील आई म्हणेल,**
**पहिली माझी ओवी, पहिला आझा नेम,**
**जिन्याखाली राम, बिडया ओढी।''[१३]**

त्यांच्या अशा उदाहरांनी वर्गा हास्याचे फवारे उडणे तर स्वाभाविकच होते. विद्यार्थी खूश असत. डॉ. भालचंद्र फडके हे विद्यार्थ्यांचे बौध्दिक मशागतही करीत.

डॉ. भालचंद्र फडके यांना नोकरीच्या निमित्याने अनेक ठिकाणी भटकावे लागले. आपल्या आयुष्याची खडतर सुरुवात त्यांनी सोलापूर शहरात केली. नंतर औरंगाबाद, अमरावती आणि शेवटी पुणे. आपला अनुभव सांगतांना प्रा. तेज निवळीकर म्हणतात, ''आपल्या देशात राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम १९७९ सालापासून सुरु करण्यात आला. या वर्षापासून डॉ. भालंचद्र फडके पुणे विद्यापिठाच्या मराठी विभागात विद्यार्थिप्रिय आणि मनमिळावू प्राध्यापक म्हणून काम करत होत. वसतिगृहाचे रेक्टर म्हणूनही अनेक विद्यार्थ्यांना ते मदत करीत असत. प्रौढ निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभागाचे एक मानद संचालक म्हणून विभागाचे नेतृत्व ते करित होते.''[१४] एक कार्यकर्ते प्राध्यापक म्हणून डॉ. फडके यांनी अनेकांना मार्गदर्शन केले आहे. एका आदर्श शिक्षकाचे सर्व गुण त्यांच्यात ठासून भरले होते. डॉ.फडके यांच्या शैक्षणिक कार्याला समाजिकतेची जोड होती. सामाजिक विकास त्यांच्या कार्यातचे तत्व होते. प्रा. तेज निवळीकर पुढे म्हणतात, ''अनेक प्राचार्य, प्राध्यापकांशी त्यांचे वैयक्तिक आणि जिव्हाळयाचे नाते ही केवळ अक्षर ओळख आहे असे आग्रहाने आणि प्रभावी वक्तृत्वाने मांडत असत. त्यामुळे प्राध्यापक सामाजिक जाणिवेपोटी या चळवळीत सहभागी झाले होते''[१५] डॉ. फडके यांनी प्रौढ शिक्षणाचे मनापसून कार्य केले . यासोबतख निरंतर शिक्षण योजनाही त्यांनी उत्स्फुर्तरीत्या राबविल्या. या योजनांची अमलबजावणी करण्यात त्यांचा कटाक्ष असे अनेक प्राध्यापक, विद्यार्थी कार्यकर्त्यांद्वारे त्यांनी हे कार्य यशस्वी केले.

**निष्कर्ष –**

जळणारे निखारे सोबत घेऊन ज्यांनी आपली वाट प्रकाशमय केली, त्यांना अंधाराचे कदापी भय नसते. डॉ. भालचंद्र फडके यांच्याबद्दलही म्हणावे लागेल बालपणापासून त्यांनी अनेक दं:ख पाहिले. हे दु:ख दलित समाजाच्या दु:खाशी जवळीक साधणारे होते. वडीलांच्या हलाखीच्या परिस्थिमुळे घरचा मोठा मुलगा म्हणुन त्यांच्यावर कौटुंबिक जबाबदारी आली. ती त्यांनी मनापासून पार पाडली. कर्तव्य बजावत डॉ. फडके शिक्षण घेत होते, शिकवित होते. त्यांना शिक्षणासोबतच कला, क्रिडा, साहित्य या सर्वाचे अंग होते. तरुणपणी दांडपट्टा, लाठीकाठी इ. मैदानी खेळात ते तरबेज होते. त्यांचा व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू होते. या सर्वांनी त्यांचे व्यक्तित्त्व आकारास आले होते. एक चतुरस्र व्यक्ती म्हणून ते अनेक गुणवैशिष्ट्यांनी युक्त होते. त्यांच्या या वैशिष्ट्यांचा लाभ विद्यार्थी घडविण्यात झालेला दिसतो.

डॉ. फडके शांत, संयमी; परंतु सत्य बाजुशी ठाम असणारे होते. पुढच्याला आपला मुद्दा पटवून देण्याची विलक्षण हातोटी त्यांच्याकडे होती. त्यांनी आंतरजातीय विवाह केला. पंतु आपल्या आईपूढे प्रेमविवाहाची बाजू मांडण्यात ते अयशस्वी ठरले. डॉ. फडके यांची आई जुन्या–विचारांची असल्याने या विवाहाचा त्यांना धक्काच बसला. या धक्यातुन (दु:खातून) त्या शेवटपर्यंत सावारु शकल्या नाहीत. हे दु:ख डॉ. फडके यांना होते. आईच्या प्रेमापासून ते पोरकेच राहिले. हेमाताईनी डॉ. फडके यांच्या संसार उत्तमरीत्या सांभाळला. हलाखीच्या परिस्थितीतही हेमाताई खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. त्यामुळेच शिक्षण शास्त्रातील अनेक व्याप सांभाळत दलिंत सामाजिक आणि साहित्य चळवळीत ते सक्रिय सहभाग घेऊन कार्य करीत राहीले. दलित साहित्य डॉ. फडके यांचा आवडीचा प्रांत. या प्रांतात त्यांनी अनेक मौलीक भर घातली. दलित साहित्याचा पाया मजबुत करण्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. डॉ. फडके मिलिंद महाविद्यालयात रुजू

झाले आणि त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. तेथील शैक्षणिक वातावरण, दलित विद्यार्थ्या.चे वास्तवानूभव, बाबासाहेबांचा सहवास, युगयात्रा नाटकाचा प्रयोग हे सर्व डॉ. फडके यांची वैचारिक जडणघडण करणारे ठरले. बाबासाहेंच्या मृत्यूनंतर दलित समाजावर दु:खाचे डोंगर कोसळले. मिलिंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या दु:खी भावानांना डॅ. फडके यांनी जवळून पाहिले. या भावना कागदावर शब्दबध्द करण्याचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यातूनच पूढे अनेकजण नामवंत कवि, लेखक म्हणून उदयास आले. पुढे निर्माण झालेल्या दलित साहित्याची बाजू त्यांनी अविरतपणे मांडली. डॉ. फडके यांना काहींनी 'दलित फडके' म्हणूनही हिणवले, परंतू त्यांनी दलित साहित्याची बांधिलकी शेवटपर्यंत सोडली नाही.

सहित्यात मांडलेले विचार आणि प्रत्यक्षात केलेले आचार यात साहित्यिकांच्या बाबतीत बरीच तफावत पहायला मिळते. दलित जाणिव; सामाजिक दृष्टीने अशा व्यापक, शब्दांचा वापर करणारी साहित्यिक मंडळी समाजात वावरतांना मात्र हेतुपरस्पर हे विसरताना दिसतात. डॉ. फडके यास अपवाद होते. मिलिंद महाविद्यालयात ते पूणे विद्यापिठ या पर्यंतच्या प्रवासात त्यांनी कित्येक विद्यार्थ्यांना मुक्तहस्ताने मदत केली. त्यांच्या उत्कृष्ठ अध्यापनाने विद्यार्थी तृप्त होत असत. याची साक्ष कल्याणी दिवेकर , तेज निवळीकर यांच्यासारखे त्यांचे अनेक विद्यार्थी लेख लिहून देत असतात. डॉ. फडके यांचे व्यक्तिमत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रभावित झालेले आहे. हे त्यांच्या साहित्य संपदेवरुन स्पष्ट होते.

## संदर्भ टिपा

१. 'अस्मितादर्श – डॉ. भालचंद्र फडके गौरव विशंषांक २०००', संपा. गंगाधर पानतावणे, औरंगाबाद, २०००, पृ. ७४
२. तत्रैव पृ. ४६
३. प्रा. दत्ता भगत, 'दलित साहित्य: दिशा व दिशांतर ', नांदेड, १९९२, पृ. १२३–१२४
४. गंगाधर पानतावणे, उनि. पृ. ४२
५. तत्रैव पृ. ५०
६. तत्रैव पृ. ५८
७. तत्रैव पृ. ७४
८. तत्रैव पृ. ७९
९. डॉ. भालचंद्र फडके, 'फुले– आंबेडकर : शोध व बोध ', औरंगाबाद, १९८५, पृ. १०५.
१०.तत्रैव पृ. १०६
११.गंगाधर पानतावणे, उनि. पृ. ५१
१२.तत्रैव पृ. ६०
१३.दै. देशोन्नती, ले. वामन निबांळकर, ऑक्टो. २००४
१४.गंगाधर पानतावणे, उनि. पृ. ८४
१५.गंगाधर पानतावणे, उनि. पृ. ८४